# दानीएलाच्या जीवनाची रूपरेषा





## कालगणनेविषयी महत्वाची नोंद

https://biblestudyindepth.in





पवित्र शास्त्रात दानीएलाचे जन्मवर्ष, निर्वासनाच्या वेळचे अचूक वय आणि मृत्यूचे वर्ष दिलेले नाही. दानीएल १ मध्ये तो राजघराण्यातील किंवा सरदार घराण्यातील, सुशिक्षित होण्याची क्षमता असलेला “तरूण” होता आणि त्याला तीन वर्षांचे राजदरबारी प्रशिक्षण देण्यात आले, असे सांगितले आहे. म्हणून बहुतेक कालगणनांमध्ये तो बाबेलला नेला गेला तेव्हा सुमारे १५-१८ वर्षांचा होता, असा अंदाज घेतला जातो. या आधारावर त्याचा जन्म ख्रि.पू. ६२३-६२० च्या आसपास मानता येतो.

या दस्तऐवजातोल ज्या तारखा आणि वये पवित्र शास्त्रात थेट दिलेली नाहीत, ती “अंदाजे” म्हणून समजावीत. निश्चित शास्त्रसंदर्भ आणि संभाव्य ऐतिहासिक कालगणना यांमध्ये स्पष्ट भेद ठेवण्यात आला आहे.

| | अंदाजे वर्ष | अंदाजे वय | जीवनातील प्रमुख घटना | शास्त्रसंदर्भ |
|---|---|---|---|---|
| 1. | ख्रि.पू. ६२३-६२० | जन्म | यहूदात, बहुधा राजघराण्यात किंवा सरदार घराण्यात जन्म | दानीएल १:३-६ |
| 2. | ख्रि.पू. ६०५ | १५-१८ | यरूशलेममधून बाबेलला बंदिवान म्हणून नेण्यात आले | दानीएल १:१-७ |
| 3. | ख्रि.पू. ६०५-६०२ | १५-२१ | तीन वर्षांचे बाबेली शिक्षण; भोजनाची परीक्षा; नवीन नाव | दानीएल १:५-२० |
| 4. | ख्रि.पू. ६०३-६०२ | १८-२१ | नबुखद्नेस्सराच्या मूर्तीच्या स्वप्नाचा अर्थ सांगितला | दानीएल २ |
| 5. | ख्रि.पू. ५९०-५७० च्या दरम्यान | ३०-५० | सोन्याची मूर्ती आणि अग्नीची भट्टी; दानीएलाचा उल्लेख नाही | दानीएल ३ |
| 6. | ख्रि.पू. ५८०-५६२ च्या दरम्यान | ४०-६० | नबुखद्नेस्सराच्या वृक्षाच्या स्वप्नाचा अर्थ | दानीएल ४ |
| 7. | ख्रि.पू. ५८६ | ३४-३७ | यरूशलेम व मंदिराचा नाश; दानीएल त्या वेळी बाबेलमध्ये | २ राजे २५ |
| 8. | ख्रि.पू. ५६२ | ५८-६१ | नबुखद्नेस्सराचा मृत्यू; बाबेलमध्ये राजकीय बदल | ऐतिहासिक पार्श्वभूमी |
| 9. | ख्रि.पू. ५५३ | ६७-७० | चार पशूंचा दृष्टान्त | दानीएल ७ |
| 10. | ख्रि.पू. ५५१ | ६९-७२ | एडका आणि बोकडाचा दृष्टान्त | दानीएल ८ |
| 11. | ख्रि.पू. ५३९ | ८१-८४ | भिंतीवरील लेख; बाबेलचे पतन | दानीएल ५ |
| 12. | ख्रि.पू. ५३९-५३८ | ८२-८५ | राष्ट्रासाठी प्रार्थना; सत्तर सप्तकांचा संदेश | दानीएल ९ |
| 13. | ख्रि.पू. ५३९-५३८ | ८२-८५ | सिंहांच्या गुहेतील परीक्षा | दानीएल ६ |
| 14. | ख्रि.पू. ५३६-५३५ | ८५-८८ | शेवटचा महान दृष्टान्त; २१ दिवसांचा उपवास | दानीएल १०-१२ |
| 15. | ख्रि.पू. ५३६ नंतर | ८५ पेक्षा अधिक | दानीएलाच्या मृत्यूची नोंद पवित्र शास्त्रात नाही | — |







https://biblestudyindepth.in